सकाळ » TODAY
सिंधुदुर्ग, शनिवार, १३ ऑगस्ट २०२२



**दोडामार्ग : सूर्यकांत परमेकर यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. सावंत.**

# परमेकर, गवस यांचा सत्कार

**दोडामार्ग :** ऑगस्ट क्रांती दिनाचे औचित्य साधून येथील हळबे महाविद्यालयात सूर्यकांत परमेकर आणि कृष्णा गवस यांचा सत्कार करण्यात आला. संपूर्ण देशात ९ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट दरम्यान स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव व 'हर घर तिरंगा' उपक्रम राबविण्यात येत आहे. त्या उपक्रमांतर्गत विविध शासकीय, निमशासकीय शाळा, महाविद्यालय पातळीवर शासनाने ठरवून दिलेल्या विविध कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. येथील लक्ष्मीबाई सीताराम हळवे महाविद्यालयातील एनएसएस व एनसीसी विभागाच्या संयुक्त विद्यमानेही सामूहिक राष्ट्रगीत झाले. क्रांती दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयाच्यावतीने गोवा मुक्ती संग्रामात सहभागी असलेले येथील परमेकर यांचा सत्कार करण्यात आला. तहसीलदार अरुण खानोलकर, पोलिस उपनिरीक्षक जयेश ठाकूर, नगरपंचायतचे मुख्याधिकारी शिवराज गायकवाड, कृषी अधिकारी नीलेश जाधव, तालुका कृषी अधिकारी प्रमोद बनकर, प्राचार्य डॉ. सुभाष सावंत, कॅप्टन कृष्णा गवस यांची उपस्थिती होती. निवृत्त कॅप्टन कृष्णा गवस यांचाही सत्कार करण्यात आला.